-:: कार्यालय ::-

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका गोंदिया यांचे कार्यालय**
**लिल्हारे बिल्डींग, वसंत नगर, बालाघाट रोड, गोंदिया जिल्हा गोंदिया**
**Email ID :- arcs_gnd@rediffmail.com** दुरध्वनी क्र.०७१८२-२५३१७७

क्रंसनिगों/नियमन/कलम७७/आदेश/ ६४९८ /२०१६
दिनांक :- २६/१२/२०१६

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)(१)(ब)(दोन) सहवाचन कलम ७३ अअअ (३)अतंर्गत आदेश**

ज्याअर्थी, **विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मुरदाडा र.नं. ५२३** तालुका गोंदिया जिल्हा गोंदिया ही संस्था (जीचा या पुढे केवळ सहकारी संस्था म्हणुन उल्लेख केलेला आहे.) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अंतर्गत नोदणीकृत सहकारी संस्था असुन सदर संस्थेला कायदा,नियम व पोटनियमातील तरतुदीनुसार कामकाज करणे बंधनकारक आहे व सदर संस्था ही या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व पोटनियमातील तरतुदीनुसार समिती सदस्यांचा कार्यकाळ ५ वर्ष इतका आहे व या कार्यालयाच्या अभिलेखानुसार सदर संस्थेच्या समिती सदस्याच्या पदावधी दिनांक **१४.०४.२०१६** रोजी सपुष्टात आलेला आहे.आणि,

ज्याआर्थी भारताचे संविधान (९७ घटना दुरूस्ती) अधिनियम २०११ नुसार सुधारीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ (३) नुसार समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांच्या आणि तीच्या पदाधिका-याची मुदत समितीच्या मुदती इतकीच असेल अशी स्पष्ट तरतुद आहे.त्यामुळे विद्यमान व्यवस्थापन समितीच्या कालावधी समाप्त झाल्यामुळे आणि व्यवस्थापन समितीच्या कार्यकाळ वाढविण्यासाठी मुदतवाढीची तरतुद सहकारी कायदयात नसल्यामुळे अशा समितीला पुढील काळासाठी काम करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार प्राप्त होत नाही.आणि,

ज्याआर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ चे पोटकलम (ब) मधील तरतुदीनुसार कोणत्याही संस्थेच्या समितीच्या किंवा तीच्या कोणत्याही सदस्याच्या पदावधी संपला म्हणून प्राधिकृत अधिकारी नियुक्ती बाबत स्पष्ट तरतुद असुन या तरतुदीनुसार **विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मुरदाडा र.नं. ५२३** या संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ सदस्याच्या कालावधी दिनांक **१४.०४.२०१६** रोजी सपुष्टात आल्यामुळे उक्त संस्थेच्या व्यवस्थापनात पोकळी निर्माण झाली असुन कलम७७ अ खंड (दोन) मधील तरतुदीनुसार नवीन समिती पदग्रहन करेपर्यंत प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे.तसेच कलम ७३ अअअ चे पोटकलक (३) मधील तरुद विचारात घेता विद्यामान संचालक मंडळाच्या पदावधी संपल्यावर मुदतवाढीची तरतुद उपलब्ध नाही.त्यामुळे उक्त संस्थेवर कलम ७७ अ (ब) (दोन) मधील तरतुदीनुसार नवीन समिती पदग्रहन करेपर्यंत उक्त संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी प्रभावाने प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे अनिवार्य झाले आहे.तसेच कलम ७७ अ च्या तरतुदीतील परंतुकानुसार अशा परिस्थितीत प्राधिकृत अधिकारी नियुक्तीच्या आदेश काढण्यापुर्वी यासंबधातील हरकती व सुचना मागविण्यासाठी नोटीस प्रसिध्द करणे वाजवीरित्या व्यवहार्य तथा आवश्यक ठरत नाही.अशी माझी खात्री झाली आहे.त्याआर्थी मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

-// आदेश //-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (१)(ब) (दोन) सहवाचन कलम ७७ अअअ (३) अतंर्गत तरतुद व महाराष्ट्र शासन सहकार व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रं.सीएसएल/१४९३/सीआर-४७/१५-सी,दिनांक ७ ऑगष्ट १९९३ नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, डी.ए. घोडेचोर, सहाय्यक निंबंधक, सहकारी संस्था, तालुका गोंदिया याद्वारे **विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मुरदाडा र.नं. ५२३** या संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ सदस्याचा पदावधी सपुष्टात आल्याने व वैधानिक दृष्टया संस्थेच्या व्यवस्थापनात पोकळी निर्माण झाल्यामुळे विद्यमान संचालक मंडळाऐवजी **श्री. एस. व्ही. बहेकार, शाखा व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. गोंदिया शाखा दवनीवाडा** यांची प्राधीकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

सदरहू आदेश आज दिनांक **२२.१२.२०१६** रोजी माझे सही व शिक्क्यानिशी पारित केला आहे.

(डी.ए.घोडेचोर)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था,तालुका गोंदिया

प्रति,

१. श्री./श्रीमती____________________

अध्यक्ष/उपाध्यक्ष/सचिव/संचालक, **विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मुरदाडा र.नं. ५२३** यांना माहितीस्तव रवाना.

२. व्यवस्थापक/सचिव, **विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मुरदाडा र.नं. ५२३** यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव रवाना. त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर आदेशाची प्रत संस्थेच्या सर्व सदस्याना तामील करुन त्याची पोहच या कार्यालयात सादर करावी तसेच, सदर आदेश संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. **श्री. एस. व्ही. बहेकार, शाखा व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. गोंदिया शाखा दवनीवाडा** यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव रवाना. त्याना कळविण्यात येते की, त्यांनी सदर संस्थेच्या प्राधिकृत अधिकारी या पदाचा तात्काळ पदभार स्विकारुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

४. मा.सरव्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.गोंदिया यांना माहितीस्तव सादर.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-** मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था,तालुका गोंदिया

F:\77-1-B Banather